# आमचे इतरांवर प्रेम आहे म्हणून आम्ही त्यांची सेवा करतो

## ‘मेंढरे’ आणि ‘शेरडे’ यातील फरक समजावून घ्या

**प्रार्थना.** “हे आमच्या स्वर्गातील बापा, मुलांना एकमेकांची प्रेमाने सेवा करण्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी कृपा करून या अभ्यासाचा उपयोग करून घे.”

पुढीलपैकी मुलांसाठी कोणतेही शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

**मत्तय 25:31-46** मधुन मेंढरे आणि शेरडे ह्यांचा कथावृत्तांत्त वाचून दखावावा. यामध्ये देव लोक त्याचे आहेत किंवा नाहीत हे कसे ठरवतो त्याबद्दल सांगितले आहे कथावृत्तांत्त सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा:

- लोकांना मेंढरे व शेरडे असे वेगळे करून त्यांचा न्याय कोण करणार आहे? (उत्तर: वचने 31-32)
- मेंढरे देवाबद्दलची त्यांची प्रीती दाखवण्यासाठी काय करतील? (35)
- शेरडे गरजू लोकांशी कसे वागतात? (42)
- आपण गरजू लोकांना मदतीचा हात देतो तेव्हा आपण नेमकी कोणाची सेवा करीत असतो? (40)
- इतरांबद्दल आपुलकी प्रेम न दाखवणाऱ्यांचे न्यायाच्या दिवशी काय होईल? (46)

मत्तय 25:31-46 मधील मेंढरे व शेरडे कथावृत्तांताचे नाट्यीकरण करा.

मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी येशू व निवेदक ह्या भूमिका कराण्यात निवेदक वृत्तांत्ताचा सारांश तयार करून मुलांकडून संवाद पाठ करून घेतील.

लहान मुलांनी मेंढरे शेरडे आणि लोकसमुदाय हया भूमिका कराण्यात.

### नाटिका, भाग 1, मत्तय 25:31-40

**निवेदक:** कथावृत्तांत्ताचा पहिला भाग (वचने 31-40) सांगून म्हणा, “लोक समुदाय काय म्हणतो ते ऐका”

**लोकसमुदाय:** “कृपा करून मला मदत करा.” “मी भुकेला आहे हो!” “मला कपडे दया हो.” “मला पाणी दया तहान लागली आहे.” “मला झोपण्यासाठी जागा दया.” “भी आजारी आहे.”

**निवेदक:** “मेंढरे काय म्हणतात ते ऐका.”

**मेंढरे** “या आम्ही तुम्हांला मदत करू, कारण आम्ही येशूवर प्रेम करतो.”

**येशू:** “मी शेरडांपासून मेंढरे वेगळे करीन मेंढरांनो चला माझ्याबरोबर या. तुम्ही आशिर्वादित आहात, कारण तुम्ही मला जेवायला दिले, मला वस्त्र दिले आणि मला मदत केलीत.”

**मेंढरे:** “पण हे सर्व आम्ही केव्हा केले? तुला याची गरज असल्याचे आम्हांला कधीच दिसले नाही.”

**येशू:** “ज्याअर्थी तुम्ही ह्या गरीब लोकांसाठी केले त्याअर्थी ते मला केले आहे.”

### नाटिका, भाग 2, मत्तय 25:41-46

**निवेदक:** वृत्तांत्ताचा दुसरा भाग (वचने 41-46) सांगून म्हणा, “लोकसमुदय काय म्हणतो ऐका.”

**लोकसमुदाय:** “कृपा करून मला मदत करा.” “मी भुकेला आहे हो!” “मला कपडे द्या हो” मला तहान लागली आहे प्यायला पाणी द्या.” “मला झोपण्यासाठी जागा द्या.” “मी आजारी आहे.”

**शेरडे:** “ए चालते व्हा येथून! मी काही तुम्हांला मदत करणार नाही.”

**येशू:** “शेरडांनो, माझ्यासमोरून चालते व्हा! मला गरज असूनही तुम्ही मला मदत केली नाही.”

**शेरडे:** “तुला गरज असल्याचे आम्ही कधी पाहिले?”

**येशू:** "ज्याअर्थी तुम्ही गरजूंना मदत केली नाही त्याअर्थी तुम्ही माझ्याशी तसेच वागलात."

**निवेदक:** नाटिकेसाठी मदत करणाऱ्या सर्वांचे आभार माना.

मंडळीच्या पुढाऱ्यांसाठी पुढील गोष्टींची व्यवस्था करा:

- उपासने मध्ये मोठया माणसांसमोर नाटिका सादर करणे.
- मुलांना ह्या अभ्यासाच्या आरंभी दिलेले प्रश्न मोठया माणसांना विचारता यावेत
- कविता (पुढे दिलेली) आणि तयार केलेले इतर कार्यक्रम मुलांना सादर करता यावेत.

गरजू लोकांना मदत करून आपल्याला कशा प्रकारे देवाची सेवा करता येते याबद्दल मुलांना विचार त्यांना उदाहरणे देऊ द्या.



अन्न जेवण असणाऱ्या वाटीचे चित्र काढा पुढच्या उपासनेत् मुलांना हे चित्र मोठया माणसांना दाखवू द्या. एकमेकांची प्रीतीने सेवा करून आपल्याला देवाची सेवा कशी करता येते ते या चित्रावरून दिसते हे, मुलांनी स्पष्ट करून सांगावे.

**पाठ करा 1** योहान 4:19-20

**कविता:** तीन मुलांनी 1 करिंथ 13:1, 4-5 आणि 6-8 ही वचने म्हणावीत:

मी माणसांच्या व देवदूतांच्या भाषामध्ये बोलत असलो, पण माझ्या ठायी प्रीती नसली तर मी वाजणारी थाळी किंवा झणझणणारी झांज असा आहे.

प्रीती सहनशील आहे, परोपकारी आहे, प्रीती हेवा करीत नाहीप्रीती बढाई मारीत नाही, फुगत नाही ती गैरशिस्त वागत नाही स्वार्थ पाहत नाही चिडत नाही, अपकार स्मरत नाही.

ती अनीतीत आनंद मानीत नाही तर सत्यासंबंधी आनंद मानते, ती सर्व काही सहन करीते, सर्व काही खरे मानण्यास सिद्ध असते, सर्वाची आशा धरते सर्वासंबंधाने धीर धरते प्रीती कधी अंतर देत नाही."

लोक प्रेमाने गरजूची सेवा कशी करतात ते दाखवणारे उदाहरण किंवा कविता गीत अथवा छोटी कथा मोठया मुलांना लिहिण्यास सांगा. हे काम त्यांना घरी किंवा आठवडयामध्ये लहान गटात करता येईल.

**प्रार्थना:** "प्रिय प्रभू खरी प्रीती म्हणजे काय हे तू आम्हांला दाखवलेस त्याबद्दल आम्ही तुझे आभार मानतो तू आमच्यावर केलीस तशी प्रीती एकमेकांवर करण्यास आमचे साहाय्य कर. गरजू लोकांना मदतीचा हात पुढे करून तुझ्यावरील आमचे प्रेम आम्हांला दाखवायचे आहे. आम्ही इतरांची सेवा करतो तेव्हा आम्ही तुझ्यावरील आमचे प्रेम व्यक्त करतो हे लक्षात ठेवण्यास आमचे साहाय्य कर."

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net